संचालक,औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,मुंबई यांचे आस्थापनेवरील सहायक संचालक, गट "ब" या पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून झालेली शिफारस / नियुक्ती रद्द करणेबाबत.

महाराष्ट्र राज्य
उद्योग, ऊर्जा कामगार व खनिकर्म विभाग
शासन आदेश क्रमांक: औसुवआ-०४२४/प्र.क्र.५१/काम.-१
मादम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:-१९ जून,२०२४.

पहा:-१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. आयएलआर-२१२१/प्र.क्र.१०३ /२०२३/ अठ्ठावीस, दि.७/९/२०२३.
२) शासन निर्णय क्र.औसुवआ-०९२३/प्र.क्र.१४८/काम.१,दि.२६/०२/२०२४.

शासन आदेश:-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संचालक,औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,मुंबई यांचे आस्थापनेवरील सहायक संचालक, गट "ब" या पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यासाठी संदर्भीय क्र.१ च्या दि.०७/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये ४४ उमेदवारांची शिफारस केली आहे.

२. सदरहू ४४ उमेदवारांमधील श्रीम.इरम फैयाज पाथरवट, (गुणवत्ता क्र.४४, वर्गवारी- DT-A (Female) यांनी सदरहू पदावर रुजू होण्यास वैयक्तिक कारणास्तव इच्छिुक नसल्याचे, त्यांनी शासनास दि.३०/१०/२०२३ रोजीच्या ई-मेल व्दारे कळविले आहे.

३. याव्यतिरिक्त शासनाने संदर्भीय क्र.२ येथील दि.२६/२/२०२४ रोजी दिलेल्या नियुक्ती आदेशातील, श्री.नरेश देविदास भारूळे, सहायक संचालक,गट-ब (गुणवत्ता क्र.१५, वर्गवारी-अ.जा.) व श्री.औंकार चरणदास चौंरे,सहायक संचालक,गट-ब (गुणवत्ता क्र.२५, वर्गवारी- भ.ज.ब) यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाव्दारे प्रसिध्द केलेल्या निकालामध्ये उपसंचालक,गट-अ या पदावरही निवड झाल्याने व ते उप संचालक,गट-अ या पदावर रुजू झाल्याचे, त्यांनी दि.१८/४/२०२४ च्या अर्जान्वये शासनास कळविले आहे.

४. यास्तव महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दि.७/०९/२०२३ च्या पत्रान्वये झालेली खालील सहायक संचालक, गट-ब या पदावरील उमेदवारांची शिफारस/नियुक्ती पुढीलप्रमाणे रद्द करण्यात येत आहे.

अ.क्र.	उमेदवारांचे नांव	गुणवत्ता क्रमांक	मुळ प्रवर्ग	मलोआ ने शिफारस केलेला प्रवर्ग
१.	श्रीम. इरम फैयाज पाथरवट	४४	DT-A (Female)	DT-A (Female-१)
२.	श्री.नरेश देविदास भारूळे	१५	अ.जा.	अ.जा. (General-२)
३.	श्री.औंकार चरणदास चौरे	२५	भ.ज.(ब)	भ.ज.(ब) (General-१)

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०६१९१२४२३७२९१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DEEPAK UTTAMRAO POKALE

Digitally signed by DEEPAK UTTAMRAO POKALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT,
2.5.4.20=856b31c793b12e4f22cb247c5cff7f3358867f2482aa2234f6131bf8940dbd2e, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F4163205E7B4960CC7CA6F973D6DEB06502B2E8FC47A411BABCF42A0E99CF34B, cn=DEEPAK UTTAMRAO POKALE
Date: 2024.06.19 12:59:29 +05'30'

(दिपक पोकळे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति
नोंदणीकृत पोचदेय डाकेने/ई-मेलव्दारे-

१) श्रीम. इरम फैयाज पाथरवट,ए-४ साक्षी हाईट,
सहयाद्री नगर, यशवंत नगर, वाई, ता.वाई,जि.सातारा-४१२८०४.

२) श्री.नरेश देविदास भारूळे, अ-२, दिवाणी सोसायटी साई नगर,
तोरणे हॉस्पीटल जवळ, आरटीओ कॉर्नर,मेरी, पो.नाशिक- ४२२००४.

३) श्री.औंकार चरणदास चौरे,लक्ष्मी नगर, वडगांव रोड,
धुमाने लेआऊट,चंद्रपूर,ता. व जि.चंद्रपूर-४४२४०१.

प्रत:-
१) मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३) मा.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (**पत्राद्वारे**)
४) उप सचिव/अवर सचिव (कामगार-१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
५) संचालक,औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,मुंबई.
६) सह/उप सचिव,सामान्य प्रशासन विभाग / कार्या.१२/१६-ब, मंत्रालय, मुंबई
७) निवड नस्ती (काम.१)